**(स्वयंअर्थसहाय्यित शाळा)**
**अंतिम मान्यता पत्र**

जाक्र शिउसं/नावि/प्राथ-२/खाप्राशा/अं.पं/२०१७/ ७८६३/६४
विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय,
नाशिक विभाग नाशिक
दिनांक -२/५/२०१७

प्रति,

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, धुळे

**विषय- सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात इंग्रजी माध्यमाची प्राथमिक शाळा सुरु करण्यास अंतिम मान्यता पत्र देण्याबाबत ....**

**संदर्भ- १. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. एसएफएस-१०१४/प्र.क्र. १७०/एसएम-२ दि. २ जून, २०१५**
**२. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि. प. धुळे यांचे प्रथम मान्यता आदेश क्र. धुजिप/शिविप्रा/स्वयंअर्थ/नशामा/२६४/२०१६ दि. ६/१०/२०१६**
**३. गटशिक्षणाधिकारी पं.स. धुळे यांचेकडील पत्र क्र. स्वंयअर्थ/प्रामा/कावि/१२/१७ दि. १३/०१/२०१७**
**४. अध्यक्ष/सचिव/मुख्याध्यापक यशवंत इंग्लिश मिडियम स्कूल, नेर ता. जि. धुळे यांचेकडील प्रस्ताव जा.क्र. वायईएमएस/१७/२०१६ दिनांक १२/१/२०१७**
**५. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि. प. धुळे यांचेकडील जा.क्र. जिपधु/शिविप्रा/स्वंयअर्थ/ ५०/२०१७ दिनांक २४/०१/२०१७**

जुन २०१६ पासुन खाली नमुद केलेल्या शैक्षणिक संस्थेला दर्शविलेल्या ठिकाणी इ.१ ली च्या वर्गास (फक्त एका तुकडीस) इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळेस स्वंयअर्थ सहाय्यित तत्वावर व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर प्राथमिक शाळा सुरु करण्यास अंतिम परवानगी देण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| संस्थेचे नाव व पत्ता- | महात्मा फुले बहुउददेशीय संस्था |
| शाळेचे नाव व पत्ता - | यशवंत इंग्लिश मिडियम स्कूल, नेर, ता. जि. धुळे |
| शाळा परवानगी वर्ष - | २०१५-२०१६ |
| माध्यम - | इंग्रजी |

१) सदर शाळेस स्वंयअर्थ सहाय्यित तत्वावर परवानगी देण्यात येत असुन कोणत्याही स्वरुपाचे अनुदान शासनाकडुन देय असणार नाही.

१.१) सदर शाळेस शासनाच्या सर्व संबधीत कायदे व नियमांची अमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

१.२) संदर्भात नमूद केलेल्या शासन निर्णयामधील तरतुदीनुसार सदरची शाळा अठरा महिन्याच्या आत सुरु केलेली आहे .सदर परवानगी खालील शर्ती अटींवर अवलंबुन आहे. त्याचा भंग झाल्यास व त्याची पुर्तता न झाल्यास शासनाने दिलेली परवानगी रदद होईल याची संबधीत संस्थेस /शाळेस कल्पना देण्यात यावी.

**अटी व शर्ती**

२.१) सदर संस्था ,संस्था नोदंणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्थ व्यवस्था १९५० नोंदणीकृत अथवा मुंबई सार्वजनिक विश्वस्थ व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

२.२) शाळेची इमारत व परिसर शिक्षणाकृत स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.

२.३) शाळेस शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार, शैक्षणिक व व्यवसायिक अर्हतेची आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद व शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्ती यांना अधिन राहुन नेमला पाहिजे.

२.४) संस्थेची आर्थिक परिस्थिती ,भौतिक सुविधा, व्यवस्थापन विषयक सुविधा इत्यादी शाळा व्यवस्थित चालविण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

२.५) संस्थेने या शाळेसाठी शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमाचे अमंलबजावणी केली पाहीजे तसेच अभ्यासक्रम पाठयपुस्तक ,मुल्यमापन पध्दती ,शालेय व सहशालेय उपक्रम यांचे सुयोग्य कार्यान्वयन केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजेत.

२.६) संस्थेने या शाळेतील विदयार्थी व कर्मचा-यांसाठी विहीत नोंदवहया व विश्वासार्ह स्वरुपात कार्यान्वीत ठेवल्या पाहिजेत.

२.७) संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणाकुल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेच्या विदयार्थ्यांच्या विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तशिरपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांचेवर बिंबवणे आवश्यक आहे

२.८) संस्थेने परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम, शाळेची जागा इत्यादी मध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही.

२.९) संस्थेचे शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे कार्यपध्दतीचे नियमाचे पालन करणे आवश्यक आहे.

२.१०) संस्थेने विदयार्थ्यांना शाळेत प्रवेश देतांना परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळांवर विपरित परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

२.११) शासनाने ज्या ठिकाणी परवानगी दिलेली आहे. त्याठिकाणा व्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रदद समजण्यात येईल.

२.१२) शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबधीत संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षी नुतणीकरणासाठी अर्ज सक्षम क्षेत्रिय अधिका-यांकडे (परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षातच) करणे बंधनकारक राहील अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रदद समजण्यात येईल. एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

३) संबधीत शिक्षणाधिकारी, प्राथमिक व प्रशासन अधिकारी नगरपालिका/महानगरपालिका शिक्षण मंडळ यांनी शासनाची परवानगी संस्थेस कळविण्यापुर्वी खालील बाबी प्रामुख्याने पडताळणी घ्याव्यात.

३.१) संबधीत संस्था दोनही कायदयाखाली नोदणीकृत आहे (२.१) प्रमाणे

३.२) संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

३.३) सदर संस्थेने चालविलेल्या अन्य प्राथमिक/माध्यमिक शाळांपैकी एखादया शाळेची मान्यता काढुन घेतलेली नाही.

३.४) संबधीत संस्थेस कोणत्याही प्रकारच्या गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

३.५) संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

३.६) संस्थेचे विहीत नमुण्यात सुधारीत शुल्कासह अर्ज केलेला आहे.

३.७) संस्थेचे यथानियम शासन मान्यतेसाठी कागदपत्रांची पुर्तता तीन महिण्यात केली आहे.

३.८) संस्थेने शाळेमध्ये शासनाच्या विहीत मान्य शैक्षणिक शुल्क दरानुसार शुल्क आकारणे आवश्यक आहे.

३.९) संबधीत संस्थेच्या शाळेस मान्यता देतांना शाळेत सुरु असलेले वर्ग (प्रत्येक तुकडी ) त्यातील विदयार्थी संख्येची प्रत्यक्ष तापसणी करुन मान्यता प्रदान करावी.

३.१०) खात्याच्या परवानगीशिवाय वरचे वर्ग व ज्यादा तुकडया सुरु करणार नाही व शाळेची जागा व माध्यम बदलणार नाही असे लेखी निवेदन घ्यावे व ते तपासणी अहवालात जोडावे.

३.११) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ अन्वये शाळांनी भौतिक सोयी सुविधा उपलब्ध करणे बंधनकाराक राहील.

३.१२) संबधीत शाळेने दरवर्षी दि.३० सप्टेंबर पर्यंत डायस डाटा मध्ये शाळेची संपुर्ण माहिती भरणे अनिवार्य असुन ती चुकीची असल्यास शाळा जबाबदार राहील.

३.१३) बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ अन्वये एन.सी.टी.ई. दिल्ली यांची अधिसुचना दिनांक २९ जुलै २०११ मध्ये नमुद केल्याप्रमाणे विहीत शैक्षणिक पात्रता असलेल्या शिक्षकांच्या नियुक्त्या करणे आवश्यक आहे.

३.१४)शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्रं-पीटीआर/११/१३/(०१/२०१३) /एसएम -४ मंत्रालय विस्तार भवन,मुंबई -३२ दि.१३ डिसेंबर २०१३ नुसार,प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेतील विदयार्थींच्या पटसंख्येच्या आधारावर शिक्षक पदे निश्चित करुन नेमणुका करणे आवश्यक आहे.

३.१५) राज्य शासनाचे त्या-त्या वर्गाचे शालेय अभ्यासक्रम, शिक्षकांचे किमान वेतन व इतर सुविधाबाबत बाबी, शासनाचे शैक्षणिक धोरण इत्यादीचे सदर संस्थेने पालन करणे बंधनकारक राहील.

वरील १ ते ३ मधील बाबीची पुर्तता करुन शासनाची परवानगी संबधीत संस्थेस चालविण्याचा निर्णय घ्यावा जर यातील कोणत्याही बाबींची पुर्तता करण्यास संबधीत संस्थेने असमर्थता दर्शविल्यास तसा अहवाल कार्यालयास त्वरीत सादर करावा म्हणजे दिलेल्या परवानगीबाबत फेरविचार करण्यात येईल. तरी या प्रकरणी पुढील कार्यवाही तात्काळ करुन अटी व शर्तीच्या अनुषंगाने पडताळणी करुन सदर प्राथमिक शाळांना मान्यता देण्याची कार्यवाही करावी. शाळा <u>स्वंयअर्थ सहाय्यित</u> तत्वावर असा फलक लावावा.

( रामचंद्र जाधव )
शिक्षण उपसंचालक,
नाशिक विभाग नाशिक

प्रत - अध्यक्ष/सचिव/मुख्याध्यापक यशवंत इंग्लिश मिडियम स्कूल, नेर, ता. जि. धुळे